# भारतीय पर्यटन कोशाच्या ई- बुकचे प्रकाशन

## साडेसात हजार पर्यटन स्थळांचा समावेश

**सातारा, ता. १३ :** सातारा येथील माधव विद्वांस यांचा भारतामधील साडेसात हजार पर्यटन स्थळांचा पर्यटन कोश 'बुक गंगा'मार्फत ई- बुक स्वरूपात विजयादशमीस प्रसिद्ध झाला आहे.




८२५ पाने, छायाचित्रांसह सर्वच भाषिक, तसेच परदेशी पर्यटकांना उपयोगी पडावे म्हणून संकलन इंग्रजीत करण्यात आले आहे. त्यात भारतातील सर्व जिल्हावार पर्यटन ठिकाणांचा समावेश आहे. त्यात सातारा जिल्ह्यातील १५७ व महाराष्ट्रातील १२०० ठिकाणांचा समावेश आहे. कृषी, आरोग्य, शिक्षण, कला, व्यापार, हस्तकला, इतिहास, पुरातन वास्तू, पौराणिक संदर्भ, अभयारण्ये, गिरिस्थाने अशा ६६ प्रकारांतील ठिकाणांचा यात समावेश आहे. अभयारण्ये- ५७५, गिरिस्थाने- १७५, सागर किनारे - २१३, जलप्रताप - ३३०, गरम पाण्याचे झरे- ५०, पदभ्रमण ठिकाणे - १९८, पुरातन वास्तू - ४४६, तसेच हिंदू, मुस्लिम, जैन, बौद्ध, शीख, ख्रिश्चन धर्मीयांची २००० च्या वर ठिकाणांचा अंतर्भाव आहे. भारतातील सर्व पर्यटन ठिकाणांची माहिती एकाच ठिकाणी मिळण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. हे पुस्तक www.bookganga.com या संकेतस्थळावरून ई- बुक स्वरूपात आपले संगणकावर उपलब्ध करून घेता येईल. यासाठी आवश्यक सॉफ्टवेअर myvishwa.com 'ध्येविकसित केले असून, पुस्तक खरेदी करणाऱ्यास ते विनाशुल्क उपलब्ध करून दिले जाईल. सातारा जिल्ह्यातून पहिले ई-बुक प्रसिद्ध होणारे विद्वांस हे पहिलेच लेखक आहेत. पहिल्या पानावर वाईच्या श्री कृष्णामाईस स्थान देऊन आशीर्वाद घेतला आहे.